जागतिक महिला दिन विशे[illegible]

8 मार्च

# पायाभूत सुविधा निर्माण करणारे कणखर व्यक्तिमत्व



विशाल राजे । नवराष्ट्र

**मुंबई.** मुंबईत पहिली भुयारी मेट्रो धावेल आणि कोस्टल रोड सुरु होईल, याला अवघे काही महिने उरले आहेत. शहरातील हे दोन प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर मुंबईचे चित्र पालटेल. या दोन्ही महत्वकांक्षी प्रकल्पांचे नेतृत्व करताहेत भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी अश्विनी भिडे. 1995 बॅचच्या महाराष्ट्र कॅडरमधील कणखर प्रशासकीय अधिकारी म्हणून त्यांना ओळखले जाते. मेट्रो आणि कोस्टल रोडसह एकूण 50 हजार कोटींच्या प्रकल्पाचे काम अश्विनी भिडे हाताळत आहेत. एवढा मोठा आणि अवाढव्य प्रकल्प योग्य रीतीने पूर्ण करण्यासाठी योग्य नियोजनासोबतच वेळेचे व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांचे मत आहे. तीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे त्या मानतात.

## 'इन्फ्रा वुमन' म्हणा...

अश्विनी भिडे यांच्या कार्यकाळात केवळ मेट्रोच नाही तर मोनोरेल, एलिव्हेटेड रोड, फ्लायओव्हर अशा अनेक मेगा प्रोजेक्ट्सचा समावेश आहे. त्यामुळेच त्यांना 'मेट्रो वुमन' या नावाने सन्मानित केल्यावर अन्याय झाल्यासारखे वाटणे स्वाभाविक आहे. त्यांना पायाभूत प्रकल्प हाताळण्याचा दोन दशकांहून अधिक अनुभव आहे आणि आजपर्यंत एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रकल्प राबविणाऱ्या त्या देशातील एकमेव आयएएस अधिकारी आहेत. एवढेच नाही तर आपल्या 28 वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी महाराष्ट्रातील इचलकरंजी, सांगली, कोल्हापूर, नागपूर, सिंधुदुर्ग या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर काम केले आहे. वनराई संस्थेच्या मदतीने त्यांनी कमी खर्चात छोटे सिंचन बंधारे बांधले, जे आजही प्रसिद्ध आहेत. त्यामुळेच त्यांना 'इन्फ्रा वुमन' म्हणून ओळखले जात आहे.

## अडचणींना सामोरे जा

भूयारी मेट्रो प्रकल्पाला जमिनीची गरज, पर्यावरण मंजुरी, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन या समस्यांना कसे तोंड द्यावे लागले आणि त्यावर एकामागून एक कशी मात करण्यात आली हे त्यांचे अनुभव स्मरणात राहणारे आहेत. या प्रकल्पासमोरचे मोठे आव्हान म्हणजे आरेमध्ये बांधल्या जाणाऱ्या कारशेडला पर्यावरणप्रेमींचा विरोध, ज्याचे प्रतिध्वनी आजही न्यायालयात ऐकायला मिळतात. त्या सांगतात, न्यायालयाने नेहमीच आमच्या प्रकल्पाच्या बाजूने निर्णय दिला आहे आणि त्या आधारावर आम्ही पुढे जात आहोत, तरीही न्यायालयात खटले दाखल करून त्यात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे मोठे आव्हान होते आणि आजही आहे. पण आपण नक्कीच यशस्वी होऊ.



## उत्कृष्ट ट्रॅक रेकॉर्ड

मुंबई मेट्रोरेल कॉर्परिशनच्या व्यवस्थापकीय संचालक या पदाशिवाय अश्विनी भिडे या मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त देखील आहेत, जिथून त्या कोस्टल रोडचे काम पाहत आहेत. याआधी त्यांनी कोल्हापूर जिल्ह्याचे सहाय्यक जिल्हाधिकारी, एमएमआरडीएमध्ये अतिरिक्त महानगर आयुक्त, सिंधुदुर्ग जिल्ह्याचे सीईओ आणि नागपूर जिल्हा परिषदेची पदे भूषवून आपला ठसा उमटवला आहे. त्यांनी देशातील सर्वात मोठा उड्डाणपूल ईस्टर्न फ्रीवे, सहार उन्नत रस्ता, मिठी नदीची स्वच्छता यासह अनेक मेगा प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केले. मोनोरेल आणि मुंबई मेट्रो प्रकल्पांसाठी संपूर्ण शहरातील 5,000 लोकांचे पुनर्वसन करण्याचे त्यांचे उत्कृष्ट कार्य केस स्टडी मानले गेले.